# दयानंद महाविद्यालयात हिंदी विषयाची कार्यशाळा



लातूर / प्रतिनिधी

येथील दयानंद कला महाविद्यालयात बी. ए. तृतीय वर्ष ऐच्छिक हिंदी विषयाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी हे. होते. यावेळी संयुक्त सचिव सुरेश जैन, प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, हिंदी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. अल्लाबक्श जमादार, अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. सतीश यादव, डॉ. उमा देशमुख, डॉ. संजय गडपायले, डॉ. सुजितसिंह परिहार, डॉ. व्यंकट पाटील आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. पुष्पलता अग्रवाल यांनी केले.

कार्यशाळेच्या समारोप समारंभास उपप्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. यावेळी त्यांच्या हस्ते कार्यशाळेत सहभागी प्राध्यापकांना प्रमाणपत्र व गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यशाळेस जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील हिंदी विषयाचे प्राध्यापक उपस्थित होते.